**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळामधील संचालक मंडळातील शासकीय सदस्यांबबत.**

**महाराष्ट्र शासन**

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग

आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक. इमाव-२०१७/ प्र.क्र. ५२/महामंडळे

मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई ४०० ०३२

दिनांक. २९.०९.२०१७

**संदर्भ** –१. शासन निर्णय, सामाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र. इमाव १०९६/ प्र.क्र.३९५ / विघयो-२, दि. २५.०९.१९९८.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांचे क्र. इमाविवि-२०१७/प्रशासन/१११०, दि. ११.०९.२०१७

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळाची स्थापना उपरोक्त संदर्भाधीन दि. २५.०९.१९९८ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. त्यानुसार सदर महामंडळाच्या संचालक मंडळावर सात शासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये सचिव, समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई (सध्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ) यांना शासकीय सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

असाधारण अधिसूचना क्रमांक २४ दि. ०९.०३.२०१७ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण या नवनिर्मित विभागाची स्थापना करण्यात आली असून या विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ देण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने दि. ०८.०८.२०१७ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे ऐवजी प्रधान सचिव / सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रगर्व कल्याण विभाग यांची नियुक्ती करण्याचा ठराव पारीत करून त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती महामंडळाने शासनास केली आहे. त्या अनुषंगाने सदर महामंडळावरील संचालक मंडळामध्ये प्रधान सचिव / सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांची शासकीय सदस्य म्हणून नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या संचालक मंडळात १५ सदस्य असून त्यामध्ये सात शासकीय सदस्य व ८ अशासकीय सदस्य आहेत. या सात शासकीय सदस्यांपैकी सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे ऐवजी अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, विमुक्त जाती भटक्या जामाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांची शासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भा.र. गावित)

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

म.रा.इ.मा.वि.वि.म -
मुख्यालय, मुंबई,
आवक क्रमांक 3550
दिनांक 25/09/17

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,

)BC

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई.
४. मा. मंत्री, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासव वर्ग व विशेष व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त, सर्व विभाग
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, चेंबूर
१४. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे
१६. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
१७. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१८. निवडनस्ती